Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 12 June 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १२ जून २०२५ सकाळी ११.०० वाजता**

****

विद्यापीठ अनुदान आयोगानं शैक्षणिक संस्थांना विद्यार्थ्यांकडून रॅगिंगविरोधी लेखी तक्रारी गोळा करण्यास आणि त्या ३० दिवसांच्या आत सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत तसंच शैक्षणिक संस्थांना त्यांच्या संकुलामधील रॅगिंगविरोधी उपाययोजनांबाबत एक व्यापक अहवालही सादर करण्यास सांगितलं आहे. या सूचनांचे पालन न केल्यास कारवाई केली जाईल, यामध्ये नावे सार्वजनिक करणं, मान्यता मागे घेणं आणि अनुदान मागे घेणं यांचा समावेश असेल असंही विद्यापीठ अनुदान आयोगानं म्हटलं आहे.

****

यूपीआय व्यवहारांवर व्यापारी सवलत दर आकारण्याबाबतचे सर्व दावे निराधार आणि दिशाभूल करणारे आहेत, असं अर्थ मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. सरकार यूपीआयच्या डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यासाठी कटीबद्ध आहे, असंही मंत्रालयानं म्हटलं आहे. सरकार मोठ्या यूपीआय व्यवहारांवर व्यापारी सवलत दर लादण्याची योजना आखत आहे, अशा बातम्या अनेक ऑनलाईन पोर्टलवर प्रसारित झाल्या होत्या, त्या पार्श्वभुमीवर मंत्रालयानं हे स्पष्टीकरण दिलं आहे.

****

आषाढी यात्रेच्या काळात राज्य परिवहन महामंडळाकडून पाच हजार विशेष बसगाड्या सोडण्याचं नियोजन करण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. तसंच राज्यातल्या कोणत्याही गावातून किमान ४० भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात येईल, असंही सरनाईक यांनी सांगितलं. तर मध्य रेल्वेकडून एक ते सात जुलै दरम्यान पंढरपूरसाठी ८० विशेष गाड्या

यात्रेसाठी सोडण्यात येणार आहेत. पुणे, मिरज, कोल्हापूर, लातूर, भुसावळ, खामगाव, नागपूर, अमरावती इथून या रेल्वेगाड्या धावणार आहेत.

****

आज जागतिक बालकामगार विरोधी दिन आहे. मुलांचं शोषण थांबवण्यासाठी आणि बालकामगार निर्मूलनासाठी प्रयत्न तीव्र करणं हे यावर्षीचं उद्दिष्ट आहे. गेल्या वर्षी सुमारे १३८ दशलक्ष बालकामगार होते, यापैकी सुमारे ५४ दशलक्ष मुलं आरोग्य, सुरक्षितता आणि विकासासाठी हानिकारक ठरतील अशी धोकादायक कामं करत होती असं आंतरराष्ट्रीय कामगार संघटना आणि संयुक्त राष्ट्र बाल निधीनं प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटलं आहे.

****

सांगली पाटबंधारे विभागाअंतर्गत पूर्णत्वाकडं जाणाऱ्या उपसा सिंचन प्रकल्पांच्या विस्तारीकरणाला निधी उपलब्ध करून देऊ असं आश्वासन राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिलं आहे.

पाटबंधारे विभागांतर्गत सांगली जिल्ह्यातील प्रकल्पांची सद्यस्थिती आणि पूर व्यवस्थापन आढावा बैठकीत काल ते बोलत होते. या विस्तारणीकरणासाठी उर्वरित क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी प्रयत्न करू त्यासाठी पाटबंधारे विभागानं नियोजन करावं आणि संभाव्य पूरपरिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी धोरणात्मक कृती आराखडा तयार करावा, अशा सूचना यावेळी विखे-पाटील यांनी दिल्या.

पुराचं पाणी दुष्काळी भागात वळवण्यासाठी जागतिक बँक सहाय्य प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रमासाठी अंदाजित तीन हजार दोनशे कोटी रूपयांचा निधी असून, हा प्रकल्प वर्षभरात पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

गोंदिया जिल्ह्यात अमली पदार्थांची विक्री करणाऱ्याविरुद्ध मोहीम सुरू असून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं वसंतनगर इथं गांजा बाळगल्याप्रकरणी दोघांना अटक केली. त्यांच्याकडून जवळपास एक लाख ४४० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी दोघांसह खरेदी करणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

राज्यात अनेक ठिकाणी सोसाट्याचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मुंबई आणि मध्य महाराष्ट्र वगळता, कोकण, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज असून दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असं आवाहन राज्याच्या कृषी विभागाने केलं आहे.

****

हुजूर साहिब नांदेड ते पंजाबच्या फिरोजपूर कॅन्ट जंक्शनपर्यंत नवीन साप्ताहिक रेल्वे सुरु करण्यात आली आहे. ही रेल्वे येत्या १५ जूनपासून दर रविवारी सकाळी नांदेडहून तर फिरोजपूरहून दर शुक्रवारी दुपारी सुटणार आहे.

****

आज संध्याकाळी हॉकी प्रो लीगमध्ये भारतीय पुरुष संघ अर्जेंटिनाविरुद्ध खेळणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी साडे सहा वाजता नेदरलँड्समधल्या ॲमस्टेलवीन इथं सुरू होईल. भारत सध्या ११ सामन्यांतून १५ गुणांसह गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे. त्यापूर्वी, काल, एका चुरशीच्या सामन्यात, भारताचा अर्जेंटिनाविरुद्ध ३-४ असा पराभव झाला.

****

आयसीसी विश्व कसोटी अजिंक्यपदाच्या अंतिम सामन्यात लंडनमधील लॉर्ड्सवर काल पहिल्या दिवशी ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव २१२ धावांत आटोपला. ब्यू वेबस्टरनं सर्वाधिक ७२ धावा केल्या. तर दक्षिण आफ्रिकेच्या कासिगो राबादानं पाच गडी बाद केले.

****